कोल्हापूर | सांगली | सातारा | सोलापूर | धाराशिव | लातूर | वर्ष 3 रे | अंक 78 | गुरूवार, 11 जून 2026 | पाने 04 | किंमत रू.4 | epaper.arambhmarathi.com




# उजळलेला महामार्ग अन् मान्सूनच्या आगमनाची आशा

धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील येरमाळा परिसरात बुधवारी सायंकाळी नयनरम्य वातावरण अनुभवायला मिळत होते. रस्त्याच्या दुतर्फा उजळलेले दिवे आणि आकाशात दाटून आलेले काळेभोर ढग यामुळे परिसराचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते. मान्सून महाराष्ट्राच्या वेशीवर दाखल झाला असून, त्याच्या आगमनाची चाहूल देणारे हे ढग शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांच्या आशा उंचावत आहेत. एकीकडे आधुनिक विकासाचे प्रतीक असलेला प्रकाशमान महामार्ग, तर दुसरीकडे पावसाच्या स्वागतासाठी सजलेला निसर्ग असा सुंदर संगम या दृश्यातून पाहायला मिळत आहे.

# पेट्रोलमध्ये पाणी ? धाराशिव शहरातील पेट्रोल पंपावर खळबळ

## वाहनधारकांचा संताप अनावर; सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करणार

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील एका पेट्रोल पंपावर बुधवारी सायंकाळी पेट्रोलमध्ये पाणी आढळल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून,यामुळे वाहनधारकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संबंधित वाहनधारकांनी पेट्रोल भरल्यानंतर वाहनात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याचा दावा करत इंधनाची तपासणी केली असता त्यामध्ये पाणी असल्याचा आरोप केला. यानंतर काही नागरिकांनी पेट्रोल पंपावर धाव घेत जाब विचारण्याचा प्रयत्न केला. घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होत असून इतर वाहनधारकांना सावध राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

दरम्यान, या प्रकरणाची अधिकृत चौकशी व्हावी आणि संबंधित इंधनाचे नमुने तपासले जावेत यासाठी गुरुवारी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित पेट्रोल पंपावरील इंधन विक्रीची तपासणी करण्याची मागणीही होत आहे. राज्यात अन्न भेसळीविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू असताना आता इंधनाच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे



### वाहनांवर काय परिणाम होऊ शकतो ?

पेट्रोलमध्ये पाणी मिसळल्यास वाहनाच्या इंजिनच्या कार्यक्षमतेवर थेट परिणाम होऊ शकतो. इंजिन सुरू होण्यास अडचण येणे, अचानक बंद पडणे, वेग घेताना झटके बसणे, मायलेज कमी होणे आणि इंधन प्रणालीतील भागांचे नुकसान होणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. आधुनिक वाहनांमध्ये इंधन इंजेक्टर, फ्युएल पंप आणि सेन्सर अत्यंत संवेदनशील असतात. त्यामुळे दूषित इंधनामुळे दुरुस्तीचा खर्चही वाढू शकतो. याच कारणामुळे अशा तक्रारी समोर आल्यानंतर इंधनाचे नमुने तपासून वस्तुस्थिती समोर आणणे आवश्यक मानले जाते.

### नेमके प्रकरण काय ?

धाराशिव शहरातील एका पेट्रोल पंपावर पेट्रोलमध्ये पाणी असल्याचा आरोप काही वाहनधारकांनी केला आहे. शहरातील वाहनधारक सुनील मुंडे यांनी यांच्या म्हणण्यानुसार, वाहनात पेट्रोल भरल्यानंतर इंजिनमध्ये अडथळे निर्माण झाले. त्यानंतर पेट्रोलची तपासणी केल्यावर त्यामध्ये पाण्याचे प्रमाण असल्याचा दावा करण्यात आला. या घटनेनंतर वाहनधारकांनी पेट्रोल पंप गाठून व्यवस्थापनाकडे जाब विचारण्याचा प्रयत्न केला. काहींनी या प्रकाराचे व्हिडिओ चित्रीकरण करून सोशल मीडियावर प्रसारित केले. या व्हिडिओंमुळे शहरात चर्चेला उधाण आले असून अनेक वाहनधारकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाची अधिकृत चौकशी झाल्यानंतरच आरोपांमध्ये तथ्य आहे की नाही, हे स्पष्ट होणार असले तरी प्राथमिक स्तरावर नागरिकांमध्ये मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

### पेट्रोलमध्ये पाणी कसे येऊ शकते ?

पेट्रोलमध्ये पाणी आढळण्यामागे अनेक तांत्रिक कारणे असू शकतात. पेट्रोल पंपावरील भूमिगत साठवण टाक्यांमध्ये गळती असल्यास भूजल किंवा पावसाचे पाणी आत शिरू शकते. मुसळधार पावसाच्या काळात टाक्यांच्या झाकणांमधून किंवा व्हेंटिलेशन प्रणालीतून पाणी जाण्याची शक्यताही व्यक्त केली जाते. काही वेळा दीर्घकाळ देखभाल न झाल्यास टाक्यांमध्ये ओलावा साचतो आणि तो इंधनामध्ये मिसळू शकतो. अलीकडे पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळले जात आहे इथेनॉलचा किंचित देखील पाण्याशी संबंध आल्यानंतर पेट्रोल आणि इथेनॉल याचे विघटन होऊ शकते.इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरच्या स्वच्छतेतील त्रुटी, साठवण प्रक्रियेतील निष्काळजीपणा किंवा वितरण यंत्रणेतील बिघाड यामुळेही अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.मात्र जाणीवपूर्वक भेसळ झाली आहे की तांत्रिक कारणामुळे हा प्रकार घडला आहे, हे प्रयोगशाळेतील तपासणी अहवालानंतरच स्पष्ट होऊ शकते.

# नळदुर्गमध्ये सुगंधित तंबाखूचा साडेतीन लाखांचा साठा जप्त

आरंभ मराठी । नळदुर्ग

नळदुर्ग येथे अन्न व औषध प्रशासन व नळदुर्ग पोलिसांनी शहरातील काजी गल्ली येथे धाड टाकून सुगंधित तंबाखूचा साडेतीन लाखाचा साठा जप्त करून एका आरोपीला अटक करून त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात केला. ही कारवाई 9 जून रोजी सकाळी साडेअकरा वाजता काजी गल्ली येथे करण्यात आली.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, नळदुर्ग येथील काजी गल्ली येथे बाबा व रत्ना नावाचा सुगंधित तंबाखूचा साठा असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन व नळदुर्ग पोलिसांना मिळाल्यानंतर दोन्ही विभागाच्या पथकाने काजी गल्ली येथील इस्माईल जबीउल्ला कुदरत उल्ला काजी याच्या घराची झडती घेतल्यानंतर त्या ठिकाणी त्यांना 3 लाख 58 हजार रुपयाची सुगंधित तंबाखू मिळून आली. याप्रकरणी वरील आरोपी विरोधात महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेले सुगंधित तंबाखू साठा बागळलेल्या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे. याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद कांगणे हे करीत आहेत. कारवाई झाल्याची माहिती मिळाल्यानंतर नळदुर्ग शहरातील विशेषता बस स्थानक, मुख्य बाजारपेठ, किल्ला गेट आदी भागातील पान टपऱ्या बंद करून पान टपरी चालक फरार झाले होते.

# जिल्हा सहकार बोर्डावर मनोज पडवळ, अभिलाष लोमटे यांची निवड

**धाराशिव** :-धाराशिव जिल्हा सहकार बोर्डाच्या संचालकपदी उपळा (मा.) येथील युवा उद्योजक, कृषी भूषण पुरस्कार प्राप्त, भाऊराव पाटील सहकारी पतसंस्थेचे सचिव तथा सहकारी चळवळीचे अभ्यासक मनोज (तात्या) शहाजीराव पडवळ यांची ओबीसी प्रवर्गातून बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे सहकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच कळंब तालुक्यातून अभिलाष बाळासाहेब लोमटे यांचीही धाराशिव जिल्हा सहकार बोर्डाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाली आहे. एकता फाऊंडेशन व एकता सहकारी संस्थेचे प्रमुख संस्थापक म्हणून कार्यरत असलेल्या लोमटे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. सहकार




विषयाचा सखोल अभ्यास, प्रभावी संघटन कौशल्य आणि नेतृत्वगुण यामुळे त्यांची ओळख जिल्हाभर निर्माण झाली आहे. मनोज पडवळ आणि अभिलाष लोमटे या दोन्ही युवा नेतृत्वांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्राला नवी ऊर्जा व दिशा मिळेल, असा विश्वास सहकार क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला आहे. शेतकरी, सभासद आणि सहकारी संस्थांच्या विकासासाठी त्यांच्या अनुभवाचा निश्चितच उपयोग होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दैनिक आरंभ मराठी

## आज आणि उद्या विशेष ग्रामसभेचे आयोजन

# धाराशिव तालुक्यातील 65 ग्रामपंचायतींच्या सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

आरंभ मराठी । धाराशिव

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार आणि जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या निर्देशानुसार धाराशिव तालुक्यातील मुदत संपलेल्या व निवडणुकीस पात्र ठरलेल्या 65 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. ही प्रक्रिया 11 व 12 जून 2026 रोजी संबंधित ग्रामपंचायतींमध्ये आयोजित विशेष ग्रामसभांद्वारे पार पडणार आहे. ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने सदस्य संख्या निश्चित करणे, प्रभाग रचना करणे तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि महिलांसाठी राखीव जागांचे आरक्षण निश्चित करून आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केली आहे. त्यानुसार धाराशिव तालुक्यातील संबंधित ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा घेऊन आरक्षण सोडत प्रक्रिया पारदर्शक व नियमबद्ध पद्धतीने राबविण्यात येणार आहे. याकामकाजासाठी तहसील कार्यालयाने विविध मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची प्राधिकृत अधिकारी व सहाय्यक म्हणून नियुक्ती केली आहे. नियुक्त प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर वेळापत्रकानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीत आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. विशेष ग्रामसभांद्वारे ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षणाची सोडत काढली जाणार असून ग्रामस्थांना या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी तहसील कार्यालय, धाराशिव येथे नियुक्त प्राधिकृत अधिकारी व सहाय्यक अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी आरक्षण निश्चिती संदर्भातील सर्व आवश्यक सूचना व मार्गदर्शक तत्त्वे देण्यात आली. तसेच सर्व अहवाल, नमुने व परिशिष्टे विहित मुदतीत तयार करून निवडणूक विभागाकडे सादर करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. सर्व नागरिकांनी आपल्या ग्रामपंचायतीच्या आरक्षण सोडत प्रक्रियेच्या वेळी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी केले आहे.

# गोरोबाकाका यांच्या राहत्या वाड्याचा १३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

आरंभ मराठी । तेर

संत शिरोमणी संत गोरोबाकाका यांच्या रहात्या वाड्याच्या बांधकामाचा १३वा वर्धापन दिन अखिल महाराष्ट्र कुंभार समाज संस्थेच्या वतीने बुधवारी (दि.१०) भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील विविध भागांतून कुंभार समाजाचे पदाधिकारी, वारकरी, भजनी मंडळे तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात ह.भ.प. दत्ता महाराज आंबीकर यांचे कीर्तन-प्रवचन संपन्न झाले. त्यांनी संत गोरोबाकाका यांच्या जीवनकार्याचा आणि वारकरी संप्रदायातील त्यांच्या योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. वर्धापन दिनानिमित्त गोरोबाकाका यांच्या




वाड्यापासून समाधी मंदिरापर्यंत टाळ, मृदंग आणि पताकांच्या गजरात दिंडी काढण्यात आली. महिला व पुरुष वारकऱ्यांनी हरिनामाचा अखंड गजर करत भक्तिभावाने सहभाग नोंदविला. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. या कार्यक्रमास कुंभार समाजाचे नागनाथ कुंभार, दत्ता धाडसकर, महादेव खटावकर, श्यामशेठ राजे, रामदास कुंभार, चनबस वायकर, विश्वनाथ कोलमकर, विनायक राऊत, रंगनाथ सूर्यवंशी, महेश सायकर, पांडुरंग (तात्या) कुंभार, महेश इटकर, अर्जुन दळे, कैलास कुंभार, दीपक चित्रे, संजय गिरकर, प्रभू गोरे, शशिकला कुंभार, मळेवाडकर, भागवत (तात्या) कुंभार, ज्ञानेश्वर माऊली कुंभार, नामदेव कुंभार, नामदास सांगवेकर यांच्यासह महाराष्ट्रभरातील कुंभार समाजातील बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.